# प्रकरण पाचवे

## सारांश आणि ठळक निष्कर्ष

# प्रकरण पाचवे
# सारांश आणि निष्कर्ष
## (Summary and Conclusions)

''महाराष्ट्रातील ग्रामीण पाणीपुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छता कार्यक्रम : संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या विशेष संदर्भात जैन्याळ गावाचे व्यष्टी अध्ययन'' हा प्रस्तुत लघुशोधप्रबंधाचा विषय आहे. या प्रकरणात, आधीच्या चार प्रकरणातील विवेचनाचा थोडक्यात सारांश आणि ठळक निष्कर्ष मांडण्यात आले आहेत.

ग्रामीण पाणीपुरवठा आणि सावर्जनिक स्वच्छता हे सामाजिक आणि पर्यावरणीय दृष्टीकोणातून महत्त्वपूर्ण असे समकालीन विषय आहेत. विकास आणि मानवी आरोग्य या दोन्ही दृष्टींनी पाणीपुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छता या विषयांचे महत्त्व अनन्य साधारण असे आहे. पाणी, स्वच्छता, आरोग्य आणि मानवी स्वास्थ्य यात थेट परस्पर संबंध आहेत. मानवी विष्ठेची अयोग्य विल्हेवाट, दूषित पाणी, व्यक्तिगत आरोग्य आणि अन्न घटकांच्या स्वच्छतेकडे होणारे दुर्लक्ष आणि द्रव आणि घनरूप कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली न जाणे या बाबी विकसनशील देशातील अनेक रोगांना जबाबदार असणारी महत्त्वपूर्ण कारणे आहेत. त्यामुळे सार्वजनिक स्वच्छता हा पर्यावरण संरक्षणातील एक महत्त्वाचा मुद्दा बनला आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे स्वरूप आणि त्याचा ग्रामीण पर्यावरणावरील प्रभाव यांचे अध्ययन करणे महत्त्वपूर्ण ठरावे.

### १) प्रकरण पहिले : 'संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचे स्वरूप'

या प्रकरणात दुय्यम स्त्रोतातून मिळविलेल्या माहितीच्या आधारे दोन विभाग केले आहेत. पहिल्या विभागामध्ये भारतातील आणि महाराष्ट्रातील पाणि पुरवठा आणि स्वच्छता विषयक परिस्थितीचा थोडक्यात आढावा घेतला आहे. दुसऱ्या विभागात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची रूपरेषा याविषयीचे विवेचन केले आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात शासनाने पाणी पुरवठा आणि स्वच्छतेच्या स्थितीत सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रयत्न केले आहेत. भारत सरकारने नेमलेल्या 'एन्व्हायरमेंटल हायजिन' कमिटीने (१९४८-४९) स्वातंत्र्यानंतर ४० वर्षांच्या काळात ९०% लोकसंख्येला पाणीपुरवठा आणि स्वच्छताविषयक सोयीसुविधा पुरविण्यासाठी एका समग्र योजनेची शिफारस केली होती. राष्ट्रीय पाणीपुरवठा आणि स्वच्छता कार्यक्रमही सुरू केला. विविध पंचवार्षिक योजनाकाळात उत्तरोत्तर अधिकाधिक अर्थसहाय्य उपलब्ध करूनही या क्षेत्रातील यश मात्र फारसे समाधानकारक राहिले नाही.

१९८१-१९९० ही दहा वर्षे आंतरराष्ट्रीय पाणी पुरवठा आणि स्वच्छता दशक' म्हणून जाहीर झाले. या दशकाच्या प्रारंभी भारतात नागरी भागातील ७७% आणि ग्रामीण भागातील ३३% लोकसंख्येला सुरक्षित पिण्याच्या पाण्याचा पुरवठा उपलब्ध होता. पण स्वच्छतेच्या बाबतीत मात्र परिस्थिती अत्यंत निराशाजनक होती. नागरी भागातील फक्त २७% लोकसंख्येला तर ग्रामीण भागातील केवळ ०.५% लोकसंख्येला स्वच्छताविषयक सोयी उपलब्ध होत्या.

भारत सरकारच्या नियोजन आयोगाने तयार केलेल्या अहवालात (२००२) असे म्हटले आहे की, ग्रामीण भारतातील सुमारे ६९ ते ७४% लोकसंख्येला सुरक्षित पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत उपलब्ध आहेत, आणि सुमारे २६ ते ३१% लोकसंख्या अजुनही पिण्याच्या पाण्याच्या सुरक्षित स्त्रोतांपासून वंचित आहे. नागरी भागातील सुमारे ९१ ते ९३% लोकसंख्येला पिण्याच्या पाण्याचे सुरक्षित स्त्रोत उपलब्ध आहेत. तर सुमारे ७ ते ९% शहरी लोकसंख्या त्यापासून अजूनही वंचित आहे. सदर अहवालातील स्वच्छताविषयक सोयींची आकडेवारी पाहता, नागरी भागातील सुमारे ७५ ते ८१% घरांना घरगुती शौचालये तर ग्रामीण भागातील सुमारे १८ ते १९% घरांना घरगुती शौचालये उपलब्ध आहेत.

सन २००३ च्या भारताविषयीच्या निबंधात, २००१ च्या जनगणना अहवालानुसार उपलब्ध असलेली, स्वच्छता विषयक सोयींच्या उपलब्धतेविषयीची अलीकडील

आकडेवारी पाहता, ग्रामीण भागातील सुमारे २२% घरांना घरगुती शौचालये उपलब्ध आहेत. म्हणजे स्वच्छतेच्या बाबतीत ग्रामीण भागातील परिस्थिती अत्यंत निराशाजनक असून अजूनही ग्रामीण भागातील घरातील सुमारे ७८% लोक उघड्यावरच शौचविधी उरकतात असे आकडेवारीवरून सूचित होते.

शहरी भागाच्या तुलनेत, ग्रामीण भागात सुरक्षित पाणीपुरवठा व स्वच्छता याबाबतची परिस्थिती समाधानकारक आहे असे वरील विवेचनावरून दिसून येते. सापेक्षत: पाणीपुरवठ्याची स्थिती काहीशी चांगली असली तरी शौचालयांची उपलब्धता आणि त्यांचा वापर याबाबत ग्रामीण भारतात कमालीचे निराशाजनक चित्र दिसते. पाणीपुरवठा आणि स्वच्छताविषयक सोयीसुविधा पुरविण्याची प्राथमिक जबाबदारी राज्य शासनाची आहे.

सन २००२ च्या नियोजन आयोगाच्या अहवालात नमूद केले आहे की, पूर्ण शासकीय नियंत्रण असलेली केंद्रीकरण झालेली आणि पुरवठा आधारित धोरणे बदलून ती विकेंद्रीत, लोककेंद्री आणि मागणीस संवेदनशील बनवावी लागतील, अशी जाणीव वाढल्यामुळे पाणी पुरवठा व स्वच्छतेच्या क्षेत्रात १९९९ पासून केंद्रीय पातळीवर धोरणात्मक बदल झालेला दिसून येतो. असाच धोरणात्मक बदल महाराष्ट्र राज्यात देखील दिसून येतो.

महाराष्ट्र राज्यातील पाणीपुरवठा आणि स्वच्छताविषयक स्थितीचा थोडक्यात आढावा पहिल्या प्रकरणाच्या दुसऱ्या भागात केला आहे. महाराष्ट्र शासनाने 'शुद्ध पाणी आणि स्वच्छ गाव' या योजनेसाठी सन १९६० पासून भरपूर निधी खर्च केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या 'जलस्वराज्य' या पुस्तिकेत दिलेल्या आकडेवारीनुसार ग्रामीण पाणीपुरवठा योजनांसाठी आजवर रु. १६,६०० कोटी खर्च करण्यात आले. ग्रामीण स्वच्छता योजनांसाठी आजवर रु. ५५० कोटी खर्च करण्यात आले. पण त्यामुळे ग्रामीण जनतेचा पाणीपुरवठा व स्वच्छतेचा प्रश्न अजुनही समाधानकारकरित्या सुटलेला नाही.

पाणी टंचाईच्या समस्येबाबत 'जलस्वराज्य' पुस्तिकेत अशी नोंद आहे की, २८,५०० ग्रामपंचायतीतील ८६,६८१ मनुष्यवस्त्यांपैकी २५,५०० वस्त्यांना पुरेसे पाणी (४० लि. प्रतिदिन, प्रति व्यक्ति) मिळत नाही. सरासरी २०,००० वस्त्यांना दरसाल पाणी टंचाईची झळ (२० लि. प्रतिदिन प्रति व्यक्ती) पोहचते. दरवर्षी सरासरी ५,५०० वस्त्यांना टँकरने पाणीपुरवठा होतो. दरवर्षी टंचाईच्या तात्पुरत्या उपाययोजनांवर सरासरी रु. १०० कोटी खर्च होतो.

राज्यातील ९६.२५ लक्ष ग्रामीण कुटुंबापैकी १९९६ पर्यंत केवळ ६ लक्ष कुटुंबाकडे शौचालये होती. शौचालय सुविधेअभावी महिलांची कुचंबणा, प्रदुषण, ग्रामीण परिसर व त्यांचे जनतेच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतात. सन १९९७-२००० या दरम्यान व्यक्तिगत शौचालय योजनेवर भर दिला. मोठ्या प्रमाणावर शासकीय अनुदान मिळाले. १६.६१ लक्ष शौचालयांची निर्मिती झाली. मात्र लोक-सहभागाअभावी शौचालयांचा अयोग्य वापर होऊ लागला व स्वच्छतेत भरीव सुधारणा झाली नाही.

सन १९६० पूर्वी ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी शासन हस्तक्षेप अगदी कमी होता. तो सुद्धा साधी विहिर, रहाट, खिराडी अशा साध्या उपाय योजनांपुरता आणि 'एक गाव एक पाणवठा' या सामाजिक जाणीवेपूरता मर्यादित होता. त्यानंतर शासनाचे पुरवठा आधारित कार्यक्रम सुरू झाले. पाण्यापेक्षा भव्यदिव्य तंत्रज्ञानावर भर दिला गेला. सन २००० मध्ये धोरण बदलले. जुन्या पुरवठा आधारित धोरणाला सोडचिठ्ठी देऊन लोकहसभागावर आधारित कार्यक्रम आखण्यात यावेत असे नवे धोरण ठरविण्यात आले. या धोरणात ग्रामपंचायत ही केंद्रबिंदू तर ग्रामसभा केंद्रस्थानी असेल. सुविधा निवड, तंत्रज्ञान निवड, निधी वापर इ. सर्व गोष्टी ग्रामंचायत व गावाच्या मताने लोकांनीच ठरवायच्या आहेत. हे सर्व करत असताना सर्व ग्रामस्थांमध्ये स्वमालकीची जाणीव होण्यासाठी लोकवर्गणीची संकल्पना आली.

ग्रामस्थांनी ग्रामस्थांच्या मागणीनुसार आवश्यक पाणीपुरवठा व स्वच्छता सुविधांचे

नियोजन व अंमलबजावणी करायची. यामध्ये शानाचा सहभाग फक्त तांत्रिक सहाय्य पुरविणे, निधी उपलब्ध करून देणे व ग्रामस्थांनी मागितलेले इतर सहकार्य यापुरता राहणार आहे. कार्यक्रमाची अंमलबजावणी ग्रामसभेत ग्रामस्थांनी नियुक्त केलेल्या ग्रामपंचायतीच्या ग्राम पुरवठा व स्वच्छता समितीकडे सोपविण्यात आली आहे. म्हणूनच "लोकांचा पुढाकार व त्यात शासनाचा सहभाग", हे या नवीन धोरणाचे ब्रीद वाक्य ठरविण्यात आले.

सन २००३ पासून महाराष्ट्र राज्यात 'हागणदारी मुक्त गाव अभियान' सध्या सर्वच जिल्ह्यात अग्रेसर झाले आहे. सन २००३ पासून शासनाने नवीन संपूर्ण स्वच्छता धोरणाचा (Total Sanitation Compaign) स्वीकार आणि अंमलबजावणी करून राज्यात ग्रामीण शौचालय बांधण्याऐवजी हागणदारीमुक्त गाव अभियानावर जास्त भर देण्याचे ठरविले. संपूर्ण स्वच्छता अभियानातील महत्त्वाचे घटक म्हणजे लोकसहभाग, शालेय स्वच्छतागृह, महिला स्वच्छतागृह, वैयक्तिक स्वच्छतागृह इ. आहेत. माहिती, शिक्षण व संवादाद्वारे (Information, Education and communication IEC) स्वच्छतेबाबत 'लोकांची गरज' ही धारणा निर्माण करून स्वच्छता व परिसर स्वच्छतेबाबत सर्व कामे मागणी आधारित करण्याचे ठरविले. यातच आता केंद्रशासन पुरस्कृत 'निर्मल ग्राम' पारितोषिकांची भर पडली असून १००% हागणदारीमुक्त गावांना रु. २ ते ४ लाखांचे बक्षिस मिळू शकते.

महाराष्ट्र राज्यात पाणीपुरवठा आणि सार्वजनिक स्वच्छता या क्षेत्रात सुधारणा घडून यावी म्हणून भरपूर खर्च करूनही म्हणावी तशी प्रगती मात्र झाली नाही. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने शासनाचा पुढाकार असलेले पुरवठा आधारित धोरण सोडून देऊन २०००-०१ पासून लोकांचा पुढाकार, त्यांचा सक्रिय सहभाग आणि त्यात शासनाचा सहभाग असलेले नवे मागणी आधारित धोरण स्विकारले आहे. महाराष्ट्राची संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान ही योजना तसेच केंद्र शासन पुरस्कृत संपूर्ण स्वच्छता अभियान या दोन्ही योजना सध्या महाराष्ट्रात नव्या धोरणावर आधारित आहेत.

यापैकी संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाचे स्वरूप पहिल्या प्रकरणाच्या दुसऱ्या भागात स्पष्ट करण्यात आले आहे.

**२) प्रकरण दुसरे : 'संशोधन समस्या आणि संशोधन पद्धती'**

या प्रकरणात दोन विभाग करण्यात आले आहेत. पहिल्या विभागात 'उपलब्ध साहित्याचे सर्वेक्षण' (Review of Literature) आणि दुसऱ्या विभागात संशोधन समस्या आणि संशोधन पद्धती (The Research Problem and Methodology)याविषयी विवेचन केले आहे.

प्रस्तुत अभ्यासासाठी विशिष्ट उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे ठरविण्यात आली होती.

अ) महाराष्ट्रात राबविण्यात आलेल्या संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाच्या स्वरूपाचा अभ्यास करणे.

ब) जैन्याळ गावात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची कशी अंमलबजावणी झाली याचा अभ्यास करणे.

क) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामुळे जैन्याळ गावात घडून आलेल्या पर्यावरणीय आणि सामाजिक परिवर्तनांचा अभ्यास करणे.

प्रस्तुत अभ्यासासाठी कोल्हापूर जिल्ह्यातील कागल तालुक्यातील जैन्याळ गावाची संशोधन क्षेत्र म्हणून निवड करण्यात आली आहे. जैन्याळ गावाला सन २००२-०३ मध्ये जिल्हा पातळीवर विभागून द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. सन २००३-०४ मध्ये जैन्याळ गावाला तालुक्यात, जिल्ह्यात, विभागात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. जैन्याळ या गावाची हेतुनिष्ठ नमुना निवड पद्धतीने (Purposive Sampling) निवड केली आहे.

प्रस्तुत संशोधनासाठी उपलब्ध कालावधी, श्रम आणि वेळ या सर्व बाबींचा विचार करून अपघाती नमुना निवड (Accidental Sampling) या नमुना निवड तंत्राचा वापर करून जैन्याळ गावातील ७५ कुटुंबांची निवड केली होती. तसेच निवडलेल्या ७५

कुटुंबांपैकी प्रत्येक कुटुंबातील एका ज्येष्ठ महिला सदस्याची प्रस्तुत अभ्यासासाठी उत्तरदाता म्हणून निवड केली आहे. तसेच अभियानात सक्रिय सहभाग घेतलेल्या गावाचे सरपंच, ग्रामसेवक, शाळेचे मुख्याध्यापक, तरुण मंडळाचे अध्यक्ष, महिला मंडळाचे अध्यक्ष या महत्त्वपूर्ण व्यक्तिंचाही उत्तरदाते म्हणून (Key Informations) हेतुपूर्वक निवड केली.

प्रस्तुत अभ्यासाची उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेऊन प्राथमिक माहिती गोळा करण्यासाठी एक मुलाखत अनुसूची तयार करून तिची पूर्वचाचणी घेण्यात आली. मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने नमुन्यातील उत्तरदात्यांकडून माहिती संकलित करण्याचे काम दि. २ जून १० जून या कालावधीत करण्यात आले आहे. दि. २ जून ते ७ जून या कालावधीत जैन्याळ गावात राहून मुलाखत अनुसूचीच्या सहाय्याने नमुन्यातील उत्तरदात्यांकडून माहिती संकलित करण्यात आलेली आहे. जैन्याळ गावाला दि. १५ ऑक्टोंबर ०४ पासून ते दि. २० डिसेंबर ०६ पर्यंत संशोधिकेने ८ वेळा भेटी दिल्या आहेत.

संकलित केलेल्या माहितीचे सांकेतिकरण करण्यात आले. सदरची माहिती समाजशास्त्र विभागात (शिवाजी विद्यापीठाच्या) UGC-DRS-Phase-I या प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध झालेल्या संगणक प्रयोगशाळेतील संगणकात भरण्यातआली. SPSS या Software चा वापर करून संगणकाच्या सहाय्याने माहितीवर प्रक्रिया करून सारण्या करण्यात आल्या. या सारण्यांच्या आधारे माहितीचे विश्लेषण करण्यात आले.

मुलाखत अनुसूचीशिवाय प्राथमिक माहिती संकलित करण्यासाठी व्यक्तिगत निरीक्षण तसेच छायाचित्रांद्वारे मिळविलेली माहिती इ. चा वापर करण्यात आला. दुय्यम माहिती स्त्रोतामध्ये शासकीय परिपत्रके, प्रकल्प अहवाल, पुस्तिका, संशोधन नियतकालिके, इंटरनेटवरून मिळवलेली माहिती व ग्रापंचायत कार्यालयातील अहवाल इ. चा समावेश आहे.

## ३) प्रकरण तिसरे : संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाची जैन्याळ गावातील अंमलबजावणी

या प्रकरणात दोन मुख्य विभाग करण्यात आलेले आहेत. पहिल्या विभागात जैन्याळ गावाचा थोडक्यात परिचय करून देऊन जैन्याळ गावाची सर्वसाधारण माहिती देण्यात आली आहे. दुसऱ्या विभागात संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान जैन्याळ गावात कसे राबविण्यात आले याविषयीचे विवेचन करण्यात आले आहे. जैन्याळ गावातील ग्रामपंचायत कार्यालयातून मिळविलेला अहवाल यासाठी मुख्यत्वेकरून उपयोगात आणला आहे. त्याचप्रमाणे व्यक्तिगत निरीक्षण आणि अनौपचारिक चर्चा यातून प्राप्त झालेल्या माहितीचाही उपयोग करण्यात आला आहे.

महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रानुसार संत गाडगेबाबा स्वच्छता अभियान राबविण्यात आले आहे. जैन्याळ गावात राबविण्यात आलेले कार्यक्रम खालीलप्रमाणे :

१ ग्रामसभेचे आयोजन

२ ग्रामसफाई व कचरामुक्ती जागृती मोहिम

३ शोषखड्ड्यांची स्वच्छता/बांधकाम जागृती मोहिम

४ शाळा व सार्वजनिक इमारती स्वच्छता जागृती मोहिम

५ घर व परिसर स्वच्छता व सजावट मोहिम

६ स्वच्छताविषयक साहित्याचे प्रदर्शन व प्रात्यक्षिके व प्रचार प्रसिद्धी याबाबतच्या तांत्रिक ज्ञानाबाबतची प्रात्य.

७ शौचालय दुरूस्ती/बांधकाम अभियान मोहिम

८ पाणी शुद्धता प्रात्यक्षिक व प्रशिक्षण मोहिम

९ वैयक्तिक स्वच्छता जागृती मोहिम

१० रस्ते दुरूस्ती, सफाई व श्रमदान मोहिम

११ जनावरे स्वच्छता मोहिम, आदर्श गोठा व स्वच्छ जनावर

१२ वृक्षसंवर्धन, परसबाग, अपारंपारिक ऊर्जा संरक्षण मोहिम

१३ गावात स्लोगन (घोषवाक्य) स्पर्धा, व्यसनमुक्ती मोहिम

१४ सदृढ बालक स्पर्धा, माता बालसंगोपन, रोगनिदान व प्रतिबंध मोहिम

१५ गटारे, सांडपाणी निर्मुलन, सांडपाणी पुर्न:वापर मोहिम

१६ संकल्प दिवस

वरील कार्यक्रम जैन्याळ गावात नेमक्या कोणत्या पद्धतीने राबविण्यात आले याचे कार्यक्रमनिहाय विवेचन या प्रकरणात आले आहे.

**४) प्रकरण चौथे : संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाचा जैन्याळ गावावरील प्रभाव.**

या प्रकरणात तीन विभाग करण्यात आले आहेत. पहिल्या विभागात उत्तरदात्यांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचे वर्णन केले आहे. दुसऱ्या विभागात अभियानामुळे घडून आलेल्या भौतिक, पर्यावरणीय आणि सामाजिक परिस्थितीत झालेल्या बदलांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे. तिसऱ्या विभागात ग्रामस्वच्छता अभियानातील जैन्याळच्या यशाला जबाबदार असलेल्या घटकांविषयीचे विश्लेषण केले आहे.

या प्रकरणाच्या पहिल्या विभागात उत्तरदात्यांच्या सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमीचे वर्णन केले आहे, ठळक मुद्दे खालीलप्रमाणे-

१) नमुन्यासाठी निवडलेल्या सर्वच उत्तरदात्या महिला आहेत.

२) नमुन्यातील बहुसंख्य ३६ (४८%) उत्तरदात्या मध्यमवयीन वयोगटातील आहेत.

३) नमुन्यातील बहुतांश ७२ (९६%) उत्तरदात्या हिंदू धर्माच्या असून उर्वरित उत्तरदात्या बौद्ध धर्माच्या आहेत.

४) नमुन्यातील बहुतांश ६९ (७२%) उत्तरदात्या विवाहित आहेत तर ऊर्वरित उत्तरदात्या विधवा आहेत.

५) नमुन्यासाठी निवडलेल्या ७५ उत्तरदात्यांपैकी ६१ (८१.३%) उत्तरदात्या मराठा जातीच्या असून उर्वरित उत्तरदात्या गुरव, महार, लोहार जातीच्या आहेत.

६) प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या ७५ उत्तरदात्यांमध्ये ६१ (८१.३%) उत्तरदात्या खुल्या प्रवर्गातील आहेत.

७) नमुन्यासाठी निवडलेल्या बहुसंख्य ४५ (६०%) उत्तरदात्या निरक्षर असून ३० (४०%) उत्तरदात्या साक्षर आहेत.

८) प्रस्तुत अभ्यासासाठी निवडलेल्या नमुन्यातील बहुतांश ५३ (७०.७%) उत्तरदात्या त्यांच्या घरकामाबरोबर शेती व्यवसाय करणाऱ्या आहेत.

९) नमुन्यातील बहुसंख्य ४४ (५८.७%) उत्तरदात्या संयुक्त कुटुंबातील आहेत.

१०) नमुन्यासाठी निवडलेल्या सर्वाधिक ३३ (४४%) उत्तरदात्यांकडे कुटुंबाची स्वत:च्या मालकीची १ ते २.२० एकर जमीन असून ती सीमांत शेतकरी कुटुंबे आहेत.

११) नमुन्यातील बहुसंख्य ४३ (५७.३%) उत्तरदात्यांची कुटुंबे १,००० ते १५,००० पर्यंत वार्षिक उत्पन्न असणारी आहेत.

प्रकरणाच्या दुसऱ्या विभागात अभियानामुळे घडून आलेल्या भौतिक, पर्यावरणीय व सामाजिक परिस्थितीत झालेल्या बदलांचे विश्लेषण करण्यात आले आहे. त्यातील काही ठळक बाबी खालीलप्रमाणे

**अ) भौतिक परिस्थितीत झालेले बदल :**

१) गावातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्यात आले आहे.

२) रस्त्यांची नियमितपणे स्वच्छता केली जाते त्यामुळे रस्ते स्वच्छ व सुंदर असून रस्त्याच्या सुरूवातीलाच आकर्षक स्वागत कमानी आहेत.

३) सांडपाणी व्यवस्थितरित्या वाहण्यासाठी गावातील संपूर्ण गटारे बंदिस्त (भूमिगत) केलेली आहेत. तसेच शोषखड्ड्यांचे बांधकामसुद्धा केलेले आहे.

४) पिण्याच्या पाण्यासाठी सार्वजनिक विंधनविहिरीचे खोदकाम केले आहे.

५) शिवकालीन पाणी साठवण टाकीचे बांधकाम केले आहे.

६) घर तिथं शौचालय ही योजना राबविली आहे. गावात २६८ कुटुंबांकडे शौचालये आहेत.

७) घरगुती शौचालय नसणारी सर्व कुटुंबे सार्वजनिक शौचालयाचा वापर करतात त्यामुळे संपूर्ण गाव हागणदारीमुक्त आहे.

८) जनावरांची नियमितपणे तपासणी व लसीकरण केले जाते.

९) गावातील संपूर्ण कचरा व्यवस्थापनासाठी गांडूळ खत प्रकल्प, नॅडेप खत प्रकल्प तयार केले आहेत.

**ब) पर्यावरण संवर्धन विषयक कार्यक्रम :**

१) वृक्षारोपण कार्यक्रमाअंतर्गत ३१,१६८ झाडे लावली आहेत. त्यामध्ये बदाम, केळी, नारळ, अशोक, रस्त्याच्या दुतर्फा दुरांडा अशा अनेक प्रकारच्या वनस्पतींचा समावेश आहे.

२) रस्त्यांची व गटारींची स्वच्छता नियमितपणे केली जाते.

३) डासांना पळवून लावण्यासाठी गप्पी मासे पैदास केंद्र सुरू केले होते.

४) अपारंपारिक ऊर्जा साधनांमध्ये निर्धुर चुल, सुधारित चुल, सिलेंडर गॅस, गोबर गॅस, सोलर कुकर, सौर कंदिल, सौर दिवे, बायोगॅस प्लँट इ. चा वापर केला जातो.

५) पिण्याच्या पाण्यात नियमितपणे टी.सी.एल. पावडर टाकून पाणी निर्जंतूक करून वापरले जाते.

६) वृद्ध लोकांना शुद्ध हवा मिळण्यासाठी तुळशीच्या विविध प्रजातींची लागवड करून ऑक्सीजन पार्क तयार केला आहे.

७) शौचालयाचा नियमितपणे वापर केला जातो.

८) जेवणापूर्वी, जेवणानंतर व शौचालयास जाऊन आल्यानंतर साबणाने हात धुतला जातो.

**क) सामाजिक परिस्थितीतील बदल :**

१) अभियानामुळे गावातील लोकांमध्ये आरोग्यविषयक जाणीव अधिक वाढली आहे.

२) गाव व्यसनमुक्त बनविण्याचा प्रयत्न केला आहे. गावात दारूबंदी यशस्वी करण्याचा प्रयत्न केला आहे.

३) तंबाखू, गुटखा इ. पदार्थांच्या विक्रीस बंदी केली आहे.

४) गावातील तरुण-तरुणींनी हुंडा घेणार नाही - हुंडा देणारही नाही अशी अग्नी शपथ घेतली आहे.

५) गावातील २८६ कुटुंबातील गृहिणींची नावे एकाच दिवशी सातबाराच्या उताऱ्यावर उतरली गेली आणि ३ जानेवारी सावित्रीबाई फुले यांच्या जयंती दिवशी गावातील महिला खऱ्या अर्थाने 'गृहस्वामिनी' झाल्या आहेत.

६) 'एक गाव एक गणपती' हा उत्सव सार्वजनिकरित्या साजरा केला जातो.

७) गावातील सर्व घरांना, सार्वजनिक इमारतीमध्ये ग्रामपंचायतीला आणि शाळेला एकच रंग दिलेला आहे. त्यातून एकात्मतेचे प्रतिक दिसून येते.

८) गावात एकीची भावना वाढीस लागली आहे.

९) गावात ग्रामपंचायतीचे नवीन बांधकाम केले आहे.

१०) प्राथमिक शाळेत ५ वी ते ७ वी पर्यंतची शाळा सुरू केली आहे.

११) लोकवर्गणीतून शाळेच्या दोन वर्गांचे बांधकाम केले आहे.

चौथ्या प्रकरणाच्या तिसऱ्या विभागात ग्रामस्वच्छता अभियानातील जैन्याळच्या यशाला जबाबदार असलेल्या घटकांविषयीचे विश्लेषण केले आहे. जैन्याळच्या यशाला जबाबदार असलेले ठळक घटक खालीलप्रमाणे -

**१) जैन्याळ गावाचा लहान आकार :**

गावाचा लहान आकार हे स्वच्छता अभियानातील जैन्याळच्या यशाचे महत्त्वाचे कारण आहे.

**२) कामाचे सुयोग्य नियोजन व संघटित मनुष्यबळाचा वापर :**

जैन्याळ गावात अभियान राबविण्याचा उद्देश डोळ्यासमोर ठेऊन गाव स्वच्छ करणे हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ११ तरुण मंडळे, २४ बचत गट, १ महिला मंडळ, व्यसनमुक्ती कमिटी या सर्वांचे सुयोग्य नियोजन व संघटित मनुष्यबळाचा कौशल्यपूर्ण वापर केला आहे.

**३) ग्रामस्थांचा ग्रामस्वच्छता अभियानातील मोठ्या प्रमाणावरील सहभाग :**

गावात व्यापक प्रमाणावरील परिवर्तन घडवून आणण्यासाठी संघटितरित्या गावातील अनेक लोकांनी एकत्र येऊन जाणीवपूर्वक आणि हेतूत: सामूहिक प्रयत्नांद्वारे गावात अभियान राबविले आहे. यावरून अभियानातील लोकांचा सहभाग अतिशय मोठ्या प्रमाणावर होता असे दिसून आले. नमुना कुटुंबातील प्रौढ पुरूष व प्रौढ स्त्रियांचा अभियानातील सरासरी सहभाग ७१% हून अधिक होता. पुरूष व स्त्रियांचा अभियानातील सहभागाच्या टक्केवारीची तुलना केली असता असे दिसून येते की, ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत स्त्रियांपेक्षा (६१.१०%) पुरूषांचा सहभाग अधिक (८१.०८%) होता.

**४) कुशल व कल्पक नेतृत्व :**

माजी सरपंचाचे कुशल नेतृत्त्व आणि ग्रामसेवकांचे सक्रीय सहभाग तसेच गावातील

सर्व स्त्री-पुरूषांच्या सहकार्यामुळे गाव अभियानांतर्गत स्पर्धेत यशस्वी होऊ शकले. या दोघांचे अभियान राबविण्यात महत्त्वाचे स्थान आहे. त्याचप्रमाणे विद्यमान सरपंच आणि अभियान कमिटीतील सर्व सदस्यांचे योगदानही महत्त्वपूर्ण होते असे अनौपचारिक चर्चेतून समजले.

**सर्वसाधारण निष्कर्ष :**

१) जैन्याळ गावात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची यशस्वी अंमलबजावणी करण्यात आली आहे.

२) स्वच्छ, शुद्ध तसेच पर्याप्त पिण्याच्या पाणी पुरवठ्याची सोय गावात करण्यात आली आहे.

३) गावातील सर्व कुटुंबांना शौचालयाची सुविधा उपलब्ध आहे आणि शौचालयाचा नियमित वापर होतो.

४) घनकचऱ्याची योग्य ती विल्हेवाट लावण्याची व्यवस्था केली आहे.

५) गावातील रस्ते स्वच्छ व सुंदर बनविण्यात आले आहेत.

६) गावातील बहुतांश गटारे बंदिस्त असून योग्य त्या ठिकाणी शोषखड्डे आहेत त्यामुळे सांडपाण्याची उत्तम व्यवस्था आहे.

७) वरील बाबींमुळे जैन्याळ गावातील पर्यावरण मानवी आरोग्याला पोषक असे बनविण्यात आले आहे.

८) पर्यावरण संवर्धन, स्त्रियांचे सबलीकरण आणि सामाजिक समस्यांच्या निराकरणासाठी अभियाना अंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यात आले आहेत.

९) संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानामुळे जैन्याळ गावात पर्यावरण संरक्षण आणि संवर्धनाविषयी तसेच सामाजिक जीवनातही महत्त्वपूर्ण बदल घडून आले आहेत.